१८७

वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय केशवनगर यांच्याकडील दि.०९/०५/२०२२ चे शिफारस पत्र
४) माध्यमिक शिक्षण विभागाचा दि.११ /०५/२०२२ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालि
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/२२९/२०२२
दि.११/०५/२०२२

विषय – नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण सं.क्र.५९३१

आदेश,

श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "सहाय्यक शिक्षक" या पदावर दि.०४/०२/१९९१ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" यांची जन्म तारीख ०१/०६/१९६४ अशी असून त्यांच्या वयास दिनांक - ३१/०५/२०२२ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" यांना ३१/०५/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील, त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यान्होनंत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही. तसेच इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.तसेच त्यांना सेवासातत्य देण्यात आलेले नाही.

सबब मी,उपआयुक्त, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" **यांना दिनांक - ३१/०५/२०२२ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण "सहाय्यक शिक्षक" यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.इंगळे हनुमंत लक्ष्मण “सहाय्यक शिक्षक”

माध्यमिक विद्यालय केशवनगर

प्रतः- १) लेखा शाखा

२)प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)

सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४

४) माध्यमिक विद्यालय केशवनगर

२/- पुढील कार्यवाहीसाठी

उप आयुक्त

माध्यमिक शिक्षण विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८